24 MAY 2026
पुढारी

# डॉ. के. आर. यादव यांचे निधन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापिठाचे माजी प्र-कुलगुरू व न्यू कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. कृष्णराव रामचंद्र तथा के. आर. यादव (वय ९०) यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा, तीन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्राचार्य व प्र-कुलगुरुपदाच्या कारकिर्दीत त्यांनी स्वत:च्या वेगळ्या प्रशासन शैलीचा ठसा उमटविला. विद्यार्थीप्रिय म्हणून ते परिचित होते. दि.२४ मे रोजी सकाळी दहा वाजता येथील पंचगंगा स्मशानभूमीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



24 MAY 2026

पुण्यनगरी

# डॉ. के. आर. यादव यांचे निधन



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू आणि न्यू कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. के. आर. तथा कृष्णराव रामचंद्र यादव यांचे शनिवारी सकाळी १० वाजता पुणे येथे निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच कोल्हापुरातील शैक्षणिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी रविवार, दि. २४ रोजी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत दुधाळी पॅव्हेलियन परिसरातील त्यांच्या 'स्नेह बंगलो' या निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता पंचगंगा स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

जनसंपर्क कक्ष

2 4 MAY 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. के. आर. यादव यांचे निधन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू आणि न्यू कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. के. आर. तथा कृष्णराव रामचंद्र यादव (वय ९०) यांचे शनिवारी सकाळी पुणे येथे निधन झाले. त्यांच्यावर रविवारी, २४ रोजी सकाळी १० वाजता कोल्हापुरात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. माजी प्राचार्य डॉ. कृष्णराव रामचंद्र यादव यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी रविवारी, २४ रोजी सकाळी ७.३० ते



## आज कोल्हापुरात अंत्यसंस्कार

९.३० वाजेपर्यंत त्यांच्या दुधाळी पॅव्हेलियन, महाराणा प्रताप हायस्कूलजवळील 'स्नेह बंगलो' या निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता पंचगंगा स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

माजी प्राचार्य के आर. यादव यांच्या पश्चात कन्या डॉ. सविता, डॉ. वसुंधरा, डॉ. वंदना घोरपडे आणि चि. राहुल, स्नुषा अश्विनी आणि नातू आदित्य असा परिवार आहे. प्राचार्य आणि प्र-कुलगुरू पदाच्या कारकिर्दीत त्यांनी स्वतःच्या आगळ्या वेगळ्या प्रशासन शैलीचा ठसा उमटवला होता.

2 4 MAY 2026

लोकमत

# विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांचे निधन

## आज अंत्यसंस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू आणि न्यू कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. के. आर. तथा कृष्णराव रामचंद्र यादव (वय ९०) यांचे शनिवारी पुणे येथे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, तीन मुली असा परिवार आहे. विद्यार्थीप्रिय आणि कडक शिस्तीचे प्राचार्य म्हणून त्यांचा दरारा होता. एचडीएफसी बँकेचे उपाध्यक्ष राहुल यादव यांचे ते वडील होत.




पुणे येथे २००६ पासून ते मुलाकडे वास्तव्याला होते. तब्येत खालावल्याने त्यांना दोन दिवसांपूर्वी रुग्णालयात दाखल केले होते. डॉ. यादव यांचे मूळ गाव साईकडे (ता. पाटण, जि. सातारा) होते. ते अडीच वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी प्राथमिक, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. कोल्हापुरात राजाराम कॉलेज येथे बी.एस्सी आणि पुणे येथे एम.एस्सी झाले. तेथून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या इचलकरंजी येथील एएससी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. सन १९७५ मध्ये ते न्यू कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून रुजू झाले.

तब्बल १६ वर्षे त्यांनी येथे सेवा बजाविली. या कॉलेजचा लौकिक वाढवण्यात त्यांचा वाटा होता. १९९१ ते १९९३ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू म्हणून त्यांनी काम केले. त्यांनी डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रमुख कार्यवाह म्हणूनही जबाबदारी सांभाळली.

दरम्यान, त्यांचे पार्थिव दुधाळी पॅव्हेलियन, महाराणा प्रताप हायस्कूलजवळील 'स्नेह बंगलो' या निवासस्थानी सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. दहा वाजता त्यांच्यावर पंचगंगा स्मशानभूमी येथे आज, रविवारी अंत्यसंस्कार होतील.

2 4 MAY 2026

जनप्रवास





# कुलगुरू डॉ. कामत यांच्याकडून महामानवांना अभिवादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शुक्रवारी रुजू झालेल्या दिवशी कोल्हापूर शहरातील महामानवांच्या पुतळ्यांना अभिवादन करून आपल्या कारकीर्दीचा प्रारंभ केला.

डॉ. कामत यांनी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा कार्यभार शुक्रवारी स्वीकारला. त्यानंतर सायंकाळी शहरातील महामानवांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. ऐतिहासिक बिंदू चौक येथील हुतात्मा स्मारक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांचे पुतळे येथे पुष्प वाहून अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजे चौकातील छत्रपतींचा पुतळा, दसरा चौक येथील छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा यांनाही अभिवादन केले. त्यानंतर राजर्षी शाहू महाराज समाधीस्थळाला भेट देऊन तेथे महाराजांच्या समाधीस्थळासमोर नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. कावळा नाका येथील करवीर राज्य संस्थापिका महाराणी ताराबाई यांच्या पुतळ्यालाही त्यांनी अभिवादन केले.

2 4 MAY 2026

जनप्रवास



# माने महाविद्यालयाच्या वतीने कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांचा सत्कार

**जनप्रवास : कागल**

शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू म्हणून कागल नगरीचे सुपुत्र प्रा. डॉ. आर. के. कामत यांची निवड झाली. याबद्दल कागल नगरीच्या वतीने व दि कागल एज्युकेशन सोसायटी आणि डी. आर. माने महाविद्यालय कागल यांच्या वतीने संस्थेचे सेक्रेटरी, सिनेट सदस्य व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रताप उर्फ भैय्यासाहेब माने यांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

विद्यापीठाच्या कुलगुरू कार्यालयात हा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य व अकादमीक कौन्सिलचे सदस्य प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम तसेच चिमणभाऊ डांगे, धैर्यशील पाटील, प्रा. डॉ. रघुनाथ ढमकले तसेच प्रा. अमरसिंह रजपूत उपस्थित होते. प्रताप उर्फ भैय्यासाहेब माने यांनी नूतन कुलगुरुंना शुभेच्छा दिल्या.

24 MAY 2026

पुण्यनगरी



# कुलगुरू डॉ. कामत यांचा सत्कार

**कसबा सांगाव :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कागलनगरीचे सुपुत्र प्रा. डॉ. रजनीश कामत यांची निवड झाली. त्याबद्दल कागलनगरीच्या वतीने दि कागल एज्युकेशन सोसायटी आणि डी. आर. माने महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे सेक्रेटरी प्रताप ऊर्फ भैय्या माने यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या कुलगुरू कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास अकादमीक कौन्सिलचे सदस्य प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम, चिमणभाऊ डांगे, धैर्यशील पाटील, प्रा. डॉ. रघुनाथ ढमकले, प्रा. अमरसिंह रजपूत उपस्थित होते.

24 MAY 2026

जनप्रवास

# विद्यापीठाचे प्रथम प्र-कुलगुरू डॉ. के. आर. यादव कालवश

**जनप्रवास : कोल्हापूर**



शिवाजी विद्यापीठाचे प्रथम प्र- कुलगुरू डॉ. कृष्णाजी रामचंद्र यादव (वय ८९) यांचे शनिवारी निधन झाले. कोल्हापुरातील दुधाळी येथे ते सध्या वास्तव्यास होते. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील पाटणचे तळमावले होते. उत्कृष्ट अध्यापक, शिस्तप्रिय आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांचा नावलौकिक होता.

त्यांनी पुणे विद्यापीठातून १९६० रोजी बी. एस्सीचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्याच विद्यापीठातून १९६२ साली एम. एस्सीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे १९८६ साली पीएच. डी. पूर्ण केली. त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या एस.सी.एम. कॉलेज, इचलकरंजी येथे १० वर्षे अध्यापन केले. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्थाच्या न्यू कॉलेज येथे १९७५

- **उत्कृष्ट, शिस्तप्रिय, विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून नावलौकिक**

पासून रसायनशास्त्र विभागप्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. २५ सप्टेंबर १९८० ते ८ एप्रिल १९९१ या कालावधीत न्यू कॉलेजचे प्राचार्य म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला. १९६७ पासून शिवाजी आणि मराठवाडा विद्यापीठाच्या विविध समित्यांवर त्यांनी कार्य केले. १९८९ ते १९९१ या काळात शिवाजी विद्यापीठ कार्यकारिणीचे ते सदस्य होते. त्यांची ९ एप्रिल १९९१ रोजी शिवाजी विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू म्हणून शासनाकडून नियुक्ती झाली. या शिवाय विविध संघटनांवर सदस्य, कार्यवाह अशा पदांची जबाबदारी सांभाळली होती. त्यांची रसायनशास्त्र विषयावरील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त पुस्तके, लेख प्रकाशित आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

जनसंपर्क कक्ष
2 4 MAY 2026 सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे पहिले माजी प्र-कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांचे निधन


के. आर. यादव

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाचे पहिले माजी प्र-कुलगुरू तथा न्यू कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. के. आर. तथा कृष्णराव रामचंद्र यादव (वय ९०) यांचे आज सकाळी पुणे येथे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांचे पार्थिव उद्या (ता. २४) कोल्हापुरातील दुधाळी पॅव्हेलियन परिसरातील महाराणा प्रताप हायस्कूलजवळील 'स्नेह बंगलो' या निवासस्थानी सकाळी साडेसात ते साडेनऊ या वेळेत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. सकाळी दहा वाजता पंचगंगा स्मशानभूमीत पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील.

डॉ. यादव २००६ पासून पुण्यात मुलांकडे राहात होते. काही दिवसांपासून ते आजारी होते. आज उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. शेतकरी कुटुंबात जन्मलेले डॉ. यादव यांनी प्रतिकुल प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. बी. एस्सी. झाल्यानंतर ते स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत रूजू झाले. त्यानंतर धाराशिव येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात ते कार्यरत होते, तर १९९१ला ते शिवाजी विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू झाले. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये दीड वर्षे प्रशासकीय विभागातही ते कार्यरत होते. त्यांच्या मागे कन्या डॉ. सविता, डॉ. वसुंधरा, डॉ. वंदन घोरपडे, मुलगा राहुल, सून, नातू असा परिवार आहे. १९६५ मध्ये त्यांचा विवाह ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांच्या भगिनी नलिनी यांच्याशी झाला. २०१५ मध्ये नलिनी यांचे निधन झाले.

## संक्षिप्त परिचय

- १५ जानेवारी १९३७ ला शेतकरी कुटुंबात जन्म, मूळगाव साईकडे (ता. पाटण, जि. सातारा)
- रयत शिक्षण संस्थेच्या कुसूर येथील गाडगेबाबा विद्यालयात प्राथमिक शिक्षण
- राजाराम महाविद्यालयातून १९६० ला बी. एस्सी., पुणे विद्यापीठातून रसायनशास्त्रातून एम.एस्सी
- इचलकरंजीतील आर्टस्, कॉमर्स अँड सायन्समध्ये प्राध्यापक म्हणून रूजू
- एनसीसी ऑफिसर म्हणून १९६४ ते १९७२ दरम्यान काम
- न्यू कॉलेजमध्ये १९७४ ला विज्ञान विभागाचे प्रमुख
- न्यू कॉलेजचे प्राचार्यपदी १६ वर्षे, एकदाही रजा नाही
- १९९१ला पहिले प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती, १९९३ ला न्यू कॉलेजमधून निवृत्त